# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१७२

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : Secretary@msbte.com


**जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/०६४** दि. 18 SEP 2020

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त पदविका संस्था.

( अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र )

**विषय :- अंतीम सत्र/वर्ष विद्यार्थ्यांच्या मंडळ स्तरावर होणाऱ्या ऑनलाईन परीक्षेकरिता मोबाईल नंबर निश्चित करणेबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/५९ दि. १०.०९.२०२०.
२. मंडळाचे पत्र क्र. मरातंशिमं/का-४०/परीक्षा/२०२०/१५७ दि. ०५.०९.२०२०.

संदर्भीय पत्र क्र. ०१ मधील मुद्दा क्र. ०२ नुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त ( अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र ) अभ्यासक्रमाच्या अंतीम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने मंडळ स्तरावर घेण्यात येणार आहेत. संदर्भ क्र. ०२ नुसार ऑनलाईन परीक्षा घेण्याच्या दृष्टीने सर्व अंतीम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची माहिती मोबाईल नंबर सह सर्व्हे फॉर्ममध्ये घेण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांनी उन्हाळी परीक्षा २०२० करिता परीक्षा अर्ज भरतांना दिलेले मोबाईल नंबर मंडळाकडे उपलब्ध आहेत. या दोन्ही माध्यमातुन काही विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर उपलब्ध होऊ शकले नाही. तसेच काही क्रमांकामध्ये तफावत अथवा चुका असल्याचे निदर्शनास आले आहे.

**मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेचे नियोजन करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर अत्यंत महत्वाचे असुन अचुक असणे आवश्यक आहे. ऑनलाईन परीक्षेकरिता Link, User ID, Password,OTP इ. मोबाईल नंबरवर देण्यात येणार आहे. त्याकरिता संस्थेने विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबरची पडताळणी करुन निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे.**

विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबरची पडताळणी करुन ऑनलाईन परीक्षेकरिता निश्चित करण्याकरिता मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर Online Activities – MSBTE Online Theory Exam Portal या लिंक अंतर्गत Institute Login मध्ये अभ्यासक्रम निहाय विद्यार्थ्यांच्या नावासमोर विद्यार्थ्यांचे मंडळाकडे उपलब्ध असलेले (सर्व्हेमधुन प्राप्त झालेले व परीक्षा अर्जात भरलेले) दोन्ही मोबाईल नंबर देण्यात आले आहेत. दोन्ही मोबाईल नंबर पैकी विद्यार्थी मंडळस्तरावरील ऑनलाईन परीक्षा देण्याकरिता जो मोबाईल नंबर वापरणार आहेत त्याची निश्चिती त्यांच्या नावासमोर देण्यात आलेल्या संबंधीत रकान्यामध्ये करण्यात यावी. या दोन्ही मोबाईल नंबर व्यतिरिक्त अन्य मोबाईल नंबर विद्यार्थी परीक्षेकरिता वापरणार असल्यास त्यांचे नावासमोरील संबंधीत रकान्यामध्ये नवीन मोबाईल नंबर नोंदवुन तो संस्थेने निश्चित करावा. सदर कार्यवाही

अत्यंत तातडीची असल्याने ती **दि. २२.०९.२०२० पुर्वी करण्यात यावी.** सर्व विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर संस्थेने निश्चित करणे आवश्यक आहे जेणेकरुन विद्यार्थी परीक्षेपासुन वंचित राहणार नाही.

संस्थांनी विद्यार्थ्यांचा निश्चित केलेला मोबाईल नंबर मंडळस्तरावरील परीक्षेकरिता अधिकृत मोबाईल नंबर असल्याने सदर मोबाईल नंबर अचुक निश्चित करण्याची जबाबदारी संस्थेची आहे. विद्यार्थ्यांचा मोबाईल नंबर चुकीचा असल्याने कोणतीही अडचण निर्माण झाल्यास त्यास विद्यार्थी व संस्था सर्वस्वी जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.

विरजाधव

( वि. र. जाधव )
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.

प्रत :-

उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर व औरंगाबाद यांना सुचित करण्यात येते की, RBTE Login मध्ये याबाबतचा अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सर्व संस्थामध्ये विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबरची निश्चिती झाल्याची खात्री करुन घ्यावी.